जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 APR 2024

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. अर्जुन चव्हाण यांचा हिंदीचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. ए. एम. सरवदे यांनी सत्कार केला. यावेळी प्राध्यापक उपस्थित होते.

# डॉ. अर्जुन चव्हाण यांचा सत्कार

कोल्हापूर, ता. ७ : लेखक हा पुरस्कारांसाठी लिहित नसतो, तर तो समाजाला योग्य दिशा, प्रेरणा देण्यासाठी लिहित असतो. याच विचाराने लिहित राहिलो आणि समाजाने याची दखल घेतली आणि राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळत गेले. आता महाकवी कालिदास पुरस्कारामुळे आणखी कसदार लेखनाची जबाबदारी वाढल्याचे जाणीव असल्याचे मत ज्येष्ठ हिंदी लेखक प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांनी व्यक्त केले. डॉ. चव्हाण यांना विश्व हिंदू शोध संवर्धन अकादमी वाराणसी व बनारस हिंदू विद्यापीठाने नुकतेच महाकवी कालिदास या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले. यानिमित्ताने शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

हिंदीचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. ए. एम. सरवदे यांच्या हस्ते डॉ. चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. चंदा सोनकर, अक्षय भोसले, प्रकाश निकम, प्रियंका बालेशगोल, फरदीन जमादार, अमृता खोत यांनी मनोगत व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 APR 2024

वार्ता सम्राट

# डॉ. जगन कराडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

कोल्हापूर /प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक , आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक व विचारवंत डॉ. जगन कराडे यांना नागपूर येथील जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले.



डॉ. जगन कराडे

शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांनी कळविले आहे. येत्या रविवारी सीताबर्डी- नागपूर येथील विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या मधुरम सभागृहात झालेल्या शानदार कार्यक्रमात पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस, छत्रपती संभाजीनगर येथील मिलींद महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान, नाटककार डॉ. सुनील रामटेके, ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. विद्याधर बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

डॉ. कराडे यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर बारा संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. यातील दोन ग्रंथ केंब्रीज स्कॉलर पब्लिकेशन, लंडन येथून प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले आहे. देशातील समाजशास्त्रज्ञांची शिखर संस्था असलेल्या अत्यंत प्रतिष्ठित अशा भारतीय समाजशास्त्र संस्थेच्या (इंडियन सोशियॉलॉजीकल सोसायटी, नवी दिल्ली) ते सदस्य (२०१३- २०१९) तसेच सचिवपदीही (२०२०-२०२१) कार्य केलेले आहे. त्यांनी व्हिएन्ना (ऑस्ट्रिया), टोरोंटो (कॅनडा) व तैपेई (तैवान) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत. टोरोंटो आंतरराष्ट्रीय परिषदेत डब्ल्यूजी-०५ (मॅमिनियन अँड सोसायटी) या संशोधन समितीच्या कार्यकारिणीवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 APR 2024
पुढारी

# बीसीए, बीबीए, बीएमएस कोर्सेससाठी ११ एप्रिलपर्यंत ऑनलाईन नोंदणी

कोल्हापूर : राज्य सामाईक परीक्षा प्रवेश कक्षाच्या वतीने पहिल्यांदाच घेण्यात येणाऱ्या बीसीए, बीबीए, बीएमएस कोर्सेससाठी एमएचटी-सीईटीसाठी ११ एप्रिलपर्यंत ऑनलाईन नावनोंदणी करता येणार आहे. www.mahaacet.org या संकेतस्थळावर परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे. बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीसीए), बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (बीबीए), बॅचलर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट स्टडीज (बीएमएस) कोर्सेस पूर्वी महाविद्यालय स्तरावर होते; परंतु हे कोर्सेस एआयसीटीईकडे देण्याचा निर्णय झाला आहे. या कोर्सेसची सीईटी परीक्षा घेतली जाणार आहे. सीईटी सेलने प्रवेशपूर्व परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे.